# बौद्धिक संपदा व अधिकार या विषयावर विषयावर वाणिज्य शाखेतर्फे विद्यापीठ स्तरीय एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**प्रस्तावना :** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित अहवाल महिला महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेद्वारा बौद्धिक संपदा अधिकार कायदा व उद्योग या विषयावर विद्यापीठ स्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे आयोजन दोन सत्रामध्ये करण्यात आले होते. कार्यशाळेच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अविनाश मोहरील हे होते. उदघाटक म्हणून स्पेशल बायोकेम प्रा. लिमिटेड च्या संचालिका मा. सौ . निशा सोनारे उपस्थित होत्या .

| | |
|---|---|
| अध्यक्ष ( प्रथम सत्र ) | - मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील |
| उदघाटक | - मा. सौ. निशा सोनारे<br>( संचालक, बायोकेम प्रा.लि. ) |
| प्रमुख वक्ता ( प्रथम सत्र ) | - मा.प्रा.विजय कुमार चौबे<br>( विधी विभाग प्रमुख,संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती ) |
| अध्यक्ष ( व्दितीय सत्र ) | - मा.प्रा. वर्षा देशमुख<br>(सहयोगी प्राध्यापक पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती) |
| प्रमुख वक्ता ( व्दितीय सत्र ) | - मा.प्रा. शिप्रा सिंघम<br>( सहयोगी प्राध्यापक यशवंत महाविद्यालय, वर्धा ) |

**उद्देश** - १) बौद्धिक संपदा व अधिकाराविषयी मुलभूत ज्ञान प्राप्त करणे.

२) बौद्धिक संपदा व अधिकाराविषयी जागरूकता निर्माण करणे.

# अहवाल

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेद्वारा बौद्धिक संपदा अधिकार कायदा व उद्योग या विषयावर विद्यापीठ स्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे आयोजन दोन सत्रामध्ये करण्यात आले होते. कार्यशाळेच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अविनाश मोहरील हे होते. उदघाटक म्हणून स्पेशल बायोकेम प्रा. लिमिटेड च्या संचालिका मा. सौ . निशा सोनारे उपस्थित होत्या .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशमुख यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये त्यांनी विषयाचे स्वरूप समजावून सांगितले. त्यांनी आपल्या भाषणात ला बौद्धिक संपदा अधिकाराच्या व्यावहारिक स्वरूपाविषयी माहिती सांगितली तसेच या कार्यशाळेच्या आयोजन करण्यामागची भूमिका स्पष्ट केली.

कार्यक्रमाच्या उदघाटक मा. सौ. निशा सोनारे यांनी आपल्या भाषणात औद्योगिक प्रवासातील अनुभव सांगितले. तसेच  आयुष्यातील काही प्रसंग सांगत त्यांच्या यशाचा आढावा विद्यार्थिनींसमोर मांडला.सोबतच उद्योजिका होण्यामध्ये त्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले हे सांगितले.व अशाप्रकारे त्या या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या हे नमूद केले. तसेच त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, त्यांचे विरोधकच आज त्यांची सर्वात मोठी संपत्ती आहे. विद्यार्थिनींनी उद्योजकतेकडे वळावे ही प्रेरणा भाषणातून मिळावी हा त्यामागचा उद्धेश होता.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील विधी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार चौबे हे उपस्थित होते._Emerging Issues In Intellectual Property Rights National And International Respective In Past Wto Era या विषयाला घेऊन उपस्थितांशी संवाद साधला. उद्योग क्षेत्रात असणाऱ्या बौद्धिक संपदा अघिकार याबद्दल त्यांनी माहिती दिली.उद्योगामध्ये बौद्धिक संपदेचे स्वरूप कसे आहे यावर चर्चा केली व जागतिक पातळीवरील बौद्धिक संपदेचे काय महत्व आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. Copyrighti पेटेंट, ट्रेडमार्क  या विषयावर त्यांनी प्रकाश टाकला व ग्राहक जागरूकता या विषयावर मार्गदर्शन केले.आजच्या स्पर्धेच्या युगात ग्राहक वर्ग जागरूक असणे कसे आवश्यक आहे आणि आजची बाजारपेठ ही कशी ग्राहककेंद्रित आहे हे समजावून सांगितले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी आज Intellectual Property ला सर्वाधिक महत्व प्राप्त झाल्याचे सांगून अशा विषयावर कार्यशाळा घेतली याबद्दल विभागाचे कौतुक केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्राला प्रमुख वक्ता म्हणून यशवंत महाविद्यालय वर्धा येथील मा. डॉ. शिप्रा सिंघम उपस्थित होत्या. " Intellectual Property Rights And Industry" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी भाषणामध्ये तंत्रज्ञानामध्ये बदलाची आवश्यकता यावर व सोबतच Copyright, Patent, Changing Environment याबद्दल सांगितले. बदलत्या उद्योजकाला बौद्धिक संपदा अधिकार उद्योजकात कसे काम करावे याबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी Artificial Intelligence या विषयावर विस्तृत माहिती दिली.

यानंतर डॉ. वर्षा देशमुख यांनी भाषणामध्ये सांगितले की,प्रत्येकामध्ये गुणवत्ता असते पण ती ओळखता यायला हवी असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. गोकुल देशमुख यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. प्रिती जवंजाळ यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. शालिनी पांडे व प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेला अमरावती शहरातील बहुतांश महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली.

**फलनिष्पत्ती** :- १) बौद्धिक संपदा अधिनियमावर आयोजित कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यपक तसेच अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील बहुतांश प्राध्यपक उपस्तिथ होते.

२) बौद्धिक संपदा अधिनियाची सविस्तर माहिती प्राप्त होऊन जागरूकता निर्माण झाली.

# कार्यशाळेचे उदघाटन समारंभ व मान्यवरांचे स्वागत









# कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये मान्यवर आपले विचार मांडतांना



कार्यशाळेच्या उद्‌घटनवर भाषण करताना बायोकेम
प्रा. लि. च्या संचालिका सौ. निशा सोनारे





प्रथम सत्रामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील

प्रथम सत्रामध्ये बीज भाषण करतांना
मा.प्रा.विजय कुमार चौबे



## कार्यशाळेच्या व्दितीय सत्रामध्ये मान्यवर आपले विचार मांडतांना



व्दितीय सत्रामध्ये बीज भाषण करतांना मा.प्रा. शिप्रा सिंघम

व्दितीय सत्रामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना मा.प्रा. वर्षा देशमुख



## कार्यशाळेच्या उपस्थित प्राध्यपक वर्ग व विद्यार्थिनी





# प्रत्येकामध्येच असते गुणवत्ता; ती ओळखण्याची दृष्टी असायला हवी

**प्रतिनिधी** | अमरावती

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयात वाणिज्य शाखेद्वारा बौद्धिक संपदा अधिकार कायदा व उद्योग या विषयावर विद्यापीठ स्तरिय एकदिवसीय कार्यशाळा नुकतीच पार पडली. कार्यशाळेचे आयोजन दोन सत्रात करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील तर उद्घाटक म्हणून स्पेशल बायोकेम प्रा. लिमिटेडच्या संचालिका निशा सोनारे उपस्थित होत्या. प्रत्येकामध्येच गुणवत्ता असते पण ती ओळखण्याची दृष्टी असली पाहिजे, असा सूर मान्यवरांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशमुख यांनी केले. निशा सोनारे यांनी भाषणात औद्योगिक प्रवासातील अनुभव सांगितले. आयुष्यातील काही प्रसंग सांगत त्यांच्या यशाचा आढावा विद्यार्थिनींसमोर मांडला. सोबतच उद्योजिका होण्यामध्ये त्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले हे सांगितले. पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील विधी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विजय कुमार चौबे हे उपस्थित होते. 'इमर्जिंग इश्यू इन इंटलेक्च्युअल प्रापर्टी राइट्स नॅशनल ॲण्ड इंटरनॅशनल रिस्पेटीव्ह इन पास्ट डब्लूटीओ इरा' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. उद्योग क्षेत्रात असणाऱ्या बौद्धिक संपदा अधिकार बाबत त्यांनी माहिती दिली. उद्योगामध्ये बौद्धिक संपदेचे स्वरूप कसे आहे, यावर चर्चा केली व जागतिक पातळीवरील बौद्धिक संपदेचे काय महत्व आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. कॉपीराइट, पेटेंट, ट्रेडमार्क या विषयावर त्यांनी प्रकाश टाकला. पहिल्या सत्राच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी विभागाचे कौतूक केले. दुसऱ्या सत्राला वर्धा येथील डॉ. शिप्रा सिंघम उपस्थित होत्या.